गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक १९ वा ● बुधवार ०५ जून २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 19 | Date : 05/06/2024 blow Wednesday Page 4 Price 4



## ४८ मतदारसंघांमध्ये हे उमेदवार झाले विजयी

१) दक्षिण मुंबई – अरविंद सावंत – ठाकरे गट
२) दक्षिण मध्य मुंबई – अनिल देसाई – ठाकरे गट
३) उत्तर पश्चिम मुंबई – रविंद्र वायकर – शिंदे गट
४) बुलढाणा – प्रतापराव जाधव – शिंदे गट
५) ठाणे – नरेश म्हस्के – शिंदे गट
६) कल्याण – श्रीकांत शिंदे – शिंदे गट
७) नाशिक – राजाभाऊ वाजे – ठाकरे गट
८) औरंगाबाद – संदीपान घुमरे – शिंदे गट
९) हिंगोली – नागेश पाटील – ठाकरे गट
१०) यवतमाळ – संजय देशमुख – ठाकरे गट
११) हातकणंगले – धैर्यशील माने – शिंदे गट
१२) मावळ – श्रीरंग बारणे – शिंदे गट
१३) शिर्डी – भाऊसाहेब वाकचौरे – ठाकरे गट
१४) बारामती – सुप्रिया सुळे – शरद पवार गट
१५) शिरुर – डॉ. अमोल कोल्हे – शरद पवार गट
१६) उत्तर मुंबई – पियूष गोयल – भाजप
१७) उत्तर मध्य मुंबई – वर्षा गायकवाड – काँग्रेस
१८) नंदुरबार – गोवाल पाडवी – काँग्रेस
१९) धुळे – डॉ. शोभा बच्छाव – काँग्रेस
२०) जालना – कल्याण काळे – काँग्रेस
२१) लातूर – शिवाजीराव काळगे – काँग्रेस
२२) नांदेड – वसंत चव्हाण – काँग्रेस
२३) अकोला – अनुप धोत्रे – भाजप
२४) अमरावती – बळवंत वानखेडे – काँग्रेस
२५) नागपूर – नितीन गडकरी – भाजप
२६) भंडारा–गोंदिया –प्रशांत पडोले – काँग्रेस
२७) गडचिरोली – डॉ. नामदेव किरसान – काँग्रेस
२८) चंद्रपूर – प्रतिभा धानोरकर – काँग्रेस
२९) पुणे – मुरलीधर मोहोळ – भाजप
३०) सोलापूर – प्रणिती शिंदे – काँग्रेस
३१) भिवंडी – बाळामामा म्हात्रे – शरद पवार गट
३२) दिंडोरी – भास्करराव भगरे – शरद पवार गट
३३) रावेर – रक्षा खडसे – भाजप
३४) बीड – बजरंग सोनवणे (महाविकास)
३५) वर्धा – अमर काळे – शरद पवार गट
३६) माढा – धैर्यशील मोहिते –पाटील – शरद पवार गट
३७) सातारा – उदयनराजे भोसले – भाजप
३८) अहमदनगर – निलेश लंके – शरद पवार गट
३९) मुंबई उत्तर पूर्व – संजय दिना पाटील – ठाकरे गट
४०) पालघर – डॉ. हिमंत सावरा – भाजप
४१) सिंधुदुर्ग – नारायण राणे – भाजप
४२) जळगाव – स्मिता वाघ – भाजप
४३) सांगली – विशाल पाटील – अपक्ष
४४) रायगड – सुनील तटकरे – अजित पवार
४५) धाराशिव – ओमराजे निंबाळकर – ठाकरे
४६) परभणी – संजय जाधव – ठाकरे
४७) रामटेक – श्यामकुमार बर्वे – काँग्रेस
४८) कोल्हापूर – शाहू महाराज छत्रपती – काँग्रेस

# अबकी बार आघाडी सरकार..!
## तिसऱ्या कार्यकाळात मोदींची मित्रांवर मदार..

मुंबई : नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील तिसरी लोकसभा निवडणूकही एकतर्फी होईल, असे बहुतेक मतदानोत्तर चाचण्यांनी वर्तवलेले निष्कर्ष आणि भाजपसमर्थक तसेच अनेक माध्यमांचे अंदाज खोटे ठरवत भारतीय मतदारांनी मंगळवारी दहा वर्षांनी प्रथमच संमिश्र कौल दिला. ४०० चा आकडा दूरच, परंतु राष्ट्रीय लोकशाही आघाडीला ३०० चा आकडाही पार करता आला नव्हता. सत्तारूढ भारतीय जनता पक्षाला तर २५० जागांच्या पुढे मजल मारता आली नाही.

अर्थात पूर्ण बहुमताच्या जोरावर रालोआच पुढील सरकार स्थापणार हे निश्रि्चत असले, तरी यानिमित्ताने पुन्हा एकदा भारतीय राजकारणाच्या केंद्रस्थानी आघाडी सरकार येणार आहे. नरेंद्र मोदींनी त्यांच्या दहा वर्षांच्या पंतप्रधानपदाच्या कारकीर्दीत



किंवा त्याआधी १३ वर्षांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकीर्दीत कधीही आघाडी सरकारच्या माध्यमातून कारभार केलेला नाही. त्यामुळे त्यांच्यासाठी हा सर्वस्वी नवीन प्रयोग असेल. ३५० ते ४०० जागा किंवा कदाचित त्याच्याही पुढे रालोआ जाईल, तसेच भाजप सलग दुसऱ्यांदा ३०० जागांच्या पल्याड मजल मारेल, या समजुतीमध्ये राहिलेल्या भाजपच्या अनेक नेत्यांचा आणि असंख्य कार्यकर्त्यांचा विलक्षण अपेक्षाभंग झाला.

पण मंगळवारी भाजपच्या किंवा रालोआच्या पीछेहाटीइतकीच लक्षणीय ठरली काँग्रेस आणि 'इंडिया' आघाडीची अनपेक्षित मुसंडी. काँग्रेस पक्ष दहा वर्षांनी प्रथमच १०० पार गेला, तर इंडिया आघाडीने पहिल्याच प्रयत्नात २०० पार दमदार मजल मारली. उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, पश्रि्चम बंगाल, राजस्थान, हरयाणा, कर्नाटक

> हा लोकशाहीचा आणि संविधानावरील विश्र्वासाचा विजय आहे. १९६२नंतर पहिल्यांदाच दोन कार्यकाळ पूर्ण करणारे सरकार पुन्हा सत्तेत आले आहे. एकवटलेल्या विरोधकांना एकट्या भाजपएवढ्या जागाही जिंकता आलेल्या नाहीत. मोठ्या निर्णयांचा नवा अध्याय लिहिला जाईल, ही मोदीची गॅरंटी आहे.– **नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

या राज्यांमध्ये इंडिया आघाडीने अनेक धक्कादायक विजय नोंदवले. विशेषत: उत्तर प्रदेशमध्ये अखिलेश यादव यांच्या समाजवादी पक्षाने भाजपच्या बालेकिल्ल्याला खिंडार पाडले. पश्रि्चम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांनी भाजपची अनपेक्षित पडझड घडवून आणली. कर्नाटकात काँग्रेसने भाजपच्या काही जागांवर विजय मिळवले. तर महाराष्ट्रात शरद पवार, उद्धव ठाकरे आणि काँग्रेस यांच्या महाविकास आघाडीने भाजप आणि फुटीर मित्रपक्षांची वाटचाल यशस्वीरीत्या रोखून धरली. बिहार, गुजरात आणि मध्य प्रदेशात भाजपने बहुतेक जागा राखल्या. तर ओडिशामध्ये लक्षणीय यश मिळवले. आंध्रातही चंद्राबाबू नायडू यांच्याशी आघाडीचा त्यांना फायदा झाला. केरळमध्ये भाजपने खाते उघडले, पण तमिळनाडूत पक्षाची पाटी कोरीच राहिली.

राममंदिर उभारणीनंतर अवघ्या काही महिन्यांनी अयोध्येमध्ये भाजपचा उमेदवार लोकसभा निवडणुकीत पराभूत होणे, ही बाब बरेच काही दर्शवून गेली. नीतिशकुमार आणि । **पान २ वर**

## प्रणिती शिंदे यांचा विजय, अटीतटीच्या लढतीत भाजपच्या राम सातपुते यांचा पराभव

सोलापूर/शहर प्रतिनिधी : सोलापुरात काँग्रेसच्या प्रणिती शिंदे यांनी विजयी गुलाल उधळला आहे. प्रणिती शिंदे यांनी भाजपच्या राम सातपुते यांचा पराभव केला. एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या सोलापूर मतदारसंघात २ टर्मपासून भाजपनं बाजी मारली होती. २०१४ आणि २०१९ मध्ये भाजपने सोलापुरात विजय मिळवला होता. सुशील कुमार शिंदे यांना पराभव झाला होता. २०२४ निवडणुकीत प्रणिती शिंदे यांनी विजय मिळवत भाजपला रोखलं. सोलापूर लोकसभा मतदारसंघ अनुसुचित जाती साठी राखीव आहे.




२४व्या फेरीनंतर सोलापुरात काँग्रेसच्या प्रणिती शिंदे यांना ६०६२७८ मते मिळाली. तर भाजपच्या राम सातपुते यांना ५२४६५७ इतकी मते मिळाली आहे. प्रणिती शिंदे यांच्याकडे सध्या ८१ हजार ६२१ मतांची मोठी आघाडी आहे. अखेरच्या एक ते दोन फेऱ्यात ही लीड तुटनं कठीण दिसतेय. त्यामुळे सोलापुरात प्रणिती शिंदेच्या विजयाचा मार्ग मोकळा झालाय. दरम्यान, प्रणिती शिंदेना पाठिंबा देणाऱ्या माजी आमदार नरसाय्या आडम यांनी जल्लोष केला. लोकसभा निवडणुकीत माकप आमदार नरसय्या आडम यांनी काँग्रेसला दिला होता पाठिंबा

लोकसभा निवडणुका जाहीर झाल्यानंतर सोलापुरात तिरंगी लढत होती. । **पान २ वर**

## धैर्यशील मोहिते पाटलांनी मारलं माढ्याचं मैदान, निंबाळकरांना पराभवाचा धक्का

माढा/प्रतिनिधी: माढा लोकसभा मतदारसंघ यावेळी संपूर्ण राज्यभर चर्चेचा विषय ठरला आहे. या मतदारसंघात दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.




या मतदारसंघातून शरद पवार गटाचे उमेदवार धैर्यशील मोहेत पाटील हे मोठ्या मतांनी विजयी झाले आहेत. मोहिते पाटील यांनी एक लाखाहून अधिक मताधिक्य घेतलं आहे. त्यांनी भाजपचे उमेदवार रणजितसिंह निंबाळकर यांचा पराभव केला आहे.

माढा लोकसभा मतदारसंघात अनेक दिग्गज नेत्यांनी जाहीर सभा घेतल्या होत्या. भाजपकडून पुन्हा रणजितसिंह निंबाळकर हे निवडणुकीच्या रिंगणात होते, तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून धैर्यशील मोहिते पाटील हे निवडणुकीच्या रिंगणात होते. या मतदारसंघात अखेर मोहिते पाटील यांनी बाजी मारलीय.

माढा लोकसभा मतदारसंघातील लढत ही अत्यंत प्रतिष्ठेची मानली जात आहे. या ठिकाणचे मतदार हे राजकीयदृष्ट्या अधिक सजग असल्याचं दिसतंय. त्यामुळे गेल्यावर्षी प्रमाणे यावर्षी देखील चांगले मतदान केलं. माढा लोकसभेत ११ लाख ९२ हजार १९० म्हणजे जवळपास ६० टक्के मतदान झालं आहे. यात सर्वात जास्त मतदान हे फलटण येथे ६४ टक्के तर सर्वात कमी मतदान । **पान २ वर**

## जुन्या मित्रांबरोबर लवकरच चर्चा; निकालानंतर राहुल गांधी यांची घोषणा, खरगे यांचा मोदींवर हल्लाबोल

> **हा भाजपचा राजकीय आणि नैतिक पराभव आहे. विरोधकांच्या प्रयत्नांत सरकारी यंत्रणांनी सातत्याने खोडा घातला. मोदी यांचे असत्य नजरेआड करून जनतेने काँग्रेसचा जाहीरनामा स्वीकारला आहे. – मल्लिकार्जुन खरगे, काँग्रेस अध्यक्ष**

नवी दिल्ली : लोकसभा निवडणूक २०२४ निकाल 'इंडिया' आघाडीची बुधवारी बैठक होणार असून त्यानंतर जुन्या मित्रांना संपर्क करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल, असे काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी निकालानंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत स्पष्ट केले. तर हा निकाल म्हणजे पंतप्रधान मोदी यांच्याविरोधात जनतेने दिलेला कौल आहे, अशी बोचरी टीका काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केली.

भाजप जादुई आकड्यापासून दूर राहात असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर संध्याकाळी पाचच्या सुमारास गांधी आणि खरगे यांनी येथील काँग्रेस मुख्यालयात पत्रकार परिषद घेतली. यावेळी गांधी म्हणाले, ही लोकसभा राज्यघटना वाचविण्यासाठी लढली गेली होती आणि देशाची जनता त्यासाठी आमच्या मागे उभी राहील, याची आम्हाला खात्री होती. संविधान



वाचविण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे आणि मोठे पाऊल आहे. वायनाड आणि रायबरेली यापैकी कोणती जागा सोडायची, याचा निर्णय अद्याप घेतला नाही, असे ते म्हणाले. यावेळी खरगे यांनी थेट पंतप्रधानांवर हल्लबोल केला. 'हा जनतेचा निकाल आणि लोकशाहीचा विजय आहे. ही लढाई जनता विरुद्ध मोदी । **पान २ वर**


## सांगलीत मान्सूनपूर्व दमदार पाऊस

सांगली : एकीकडे निवडणुक मतमोजणीची धांदल उडाली असताना सायंकाळी मान्सूनपूर्व पावसाने सांगली जिल्ह्यात बहुतांशी ठिकाणी झोडपून काढले. दमदार पाऊस पडत असतानाही कार्यकर्ते गुलालाने माखलेल्या स्थितीत विजयाचा आनंद सांगलीत साजरा करत होते. दिवसभराच्या तीव्र उष्म्यानंतर सायंकाळी साडेतीन वाजल्यानंतर सुमारे एक तास पावसाने दमदार हजेरी लावली. पावसाने शहरातील रस्ते तर जलमय झाले होतेच, पण ग्रामीण भागात ओढे, नाले यांनाही यंदाच्या हंगामात पहिल्यांदाच पाणी आले.

मिरज, सांगलीसह तासगाव, भिलवडी, अंकलखोप, पलूस आदी ठिकाणी दमदार पाउस झाला आहे. मान्सूनपूर्व पाउस झाल्याने आता मृग नक्षत्राच्या पेरणीला हा पाउस पोषक ठरणार आहे. दोन दिवसात मान्सूनचे आगमन होणार असून त्यानंतर खरीप पेरण्याची धांदल उडणार आहे.तासगाव परिसरात दमदार पाउस झाल्याने खरीपाच्या पेरणीला उपयुक्त ठरणार असून द्राक्ष बागेची काडी तयार होण्यासाठी हा पाउस उपयुक्त ठरणार आहे. काडीमध्ये फळधारणा होण्यासाठी पाण्याची नितांत गरज असताना हा पाउस झाल्याने समाधान व्यक्त होत आहे.

## इंडिया आघाडीनं सत्ता स्थापनेचा दावा करावा,उद्धव ठाकरेंचं मोठं वक्तव्य

मुंबई : उद्धव ठाकरे यांनी आपल्या देशात सर्वसामान्य माणसांनी त्यांची ताकद काय असते हे दाखवून दिलं आहे. सर्वसामान्य माणसांनी त्यांची तागद दाखवून दिली आहे. सत्ताधारी कितीही मस्तवाल झाले तरी एका बोटाच्या आधारे आपण त्यांना रोखू शकतो, असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं. इंडिया आघाडीनं सत्तास्थापनेवर दावा केला पाहिजे, असं उद्धव ठाकरे म्हणाले. इंडिया आघाडीच्या बैठकीला उद्या दुपारी जाणार आहे. बाहेरगावी असलेले खासदार उद्या सकाळी येथे येतील, असं उद्धव ठाकरे म्हणाले. सकाळी संजय राऊत दिल्लीला जातील मी उद्या दुपारी दिल्ली जाणार आहे, असं उद्धव ठाकरे म्हणाले. इंडिया आघाडी म्हणून आघाडी आम्ही तयार केली तेव्हा आमच्यापैकी कोणीही पंतप्रधानपदावर दावा केला नव्हता. उद्या सर्वांच्या मतानं इंडिया आघाडीचा नेता ठरवला जाईल, असं उद्धव ठाकरे म्हणाले. बिहारमध्ये अजूनही मतमोजणी सुरु आहे, काही ठिकाणी छोटे घटकपक्ष आहेत त्यांना संपर्क सुरु आहे, असं उद्धव ठाकरे म्हणाले. चंद्राबाबू नायडू आणि इतरांशी काँग्रेसकडून इतरांकडून संपर्क सुरु आहेत. **पान २ वर**



# संपादकीय

## फलंदाजांना द्यावी...

फुटलबॉल बेसबॉल आणि टेनिस यासारख्या व्यावसायिक खेळांसाठी प्रसिध्द असलेल्या अमेरिकेमध्ये आता क्रिकेट रुजणार आहे. इंटरनॅशनल क्रिकेट काउन्सिल आयोजित टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेला अमेरिकेमध्ये सुरुवात झाल्याने आता अमेरिकेमध्ये क्रिकेटची चर्चा होणार आहे. जगभरातील वीस देश या विश्वचषक स्पर्धेमध्ये भाग घेणार असल्याने आतापर्यंतची ही सर्वात मोठी विश्वचषक स्पर्धाही ठरणार आहे. अमेरिका आणि वेस्ट इंडीज यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा होणार असली तरी त्यामध्ये अमेरिकेचा वाटा मोठा आहे. या निमित्ताने अमेरिकेसारख्या मोठ्या देशामध्ये क्रिकेटचे वातावरण तयार होणार आहेच, शिवाय ज्या देशांमध्ये अद्याप क्रिकेट लोकप्रिय झालेले नाही त्या देशांनासुध्दा आंतरराष्ट्री पातळीवरील संघांसोबत खेळण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या स्पर्धेतील काही संघांवर नजर टाकली तर पहिल्यांदाच क्रिकेटच्या मैदानावर क्रिकेट स्पर्धेमध्ये हे देश सहभागी होणार आहेत. काही ठरावीक देशांमध्ये लोकप्रिय असलेला क्रिकेटचा खेळ जगाच्या कानाकोपऱ्यातही पोहोचवण्याचे उद्दिष्ट या निमित्ताने सिध्द होऊ शकेल. भारतासाठी विचार करायचा झाल्यास यावेळी तरी भारत विश्वचषक स्पर्धा जिंकणार आहे की नाही हीच एक शंका प्रत्येकाच्या मनात आहे. भारतीय क्रिकेट संघाला गेल्या तेरा वर्षांपासून आयसीसी पुरस्कृत कोणत्याही विश्वचषक स्पर्धेमध्ये विजेतेपद मिळवता आलेले नाही. गेल्या काही वर्षांच्या कालावधीत झालेल्या कोणत्याही विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम किंवा उपान्त्य फेरीपर्यंत धडक मारलेल्या भारताला विश्वचषकावर मात्र नाव कोरता आलेले नाही. गेल्या वर्षी भारतात झालेल्या एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेतही अंतिम फेरीपर्यंत अपराजित राहिलेल्या भारताला अंतिम फेरीमध्ये मात्र ऑस्ट्रेलियाकडून हार पत्करावी लागली होती आणि पुन्हा एकदा विश्वचषकापासून वंचित राहावे लागले होते. साहजिकच अमेरिकेत होणाऱ्या या विश्वचषक स्पर्धेमध्ये तरी भारत विजेता ठरणार की नाही याची उत्सुकता सर्वांना आहे. नेहमीप्रमाणेच क्रिकेट तज्ज्ञांनी यावेळी पुन्हा एकदा फेव्हरेट संघाच्या यादीमध्ये भारताचा समावेश केला आहे. या तज्ज्ञांची ही अपेक्षा पूर्ण करण्याची जबाबदारी भारतीय संघाला पार पाडावी लागणार आहे. कित्येक वर्षांपासून भारतीय क्रिकेटचा अविभाज्य भाग असलेले विराट कोहली आणि रोहित शर्मा या फलंदाजांची ही शेवटची विश्वचषक स्पर्धा असणार आहे. या स्पर्धेमध्ये देदीप्यमान कामगिरी करून भारतीय क्रिकेट संघाने विश्वचषक जिंकून ती भेट या दोन महान फलंदाजांना द्यावी.

# बुलढाणा लोकसभा मतदारसंघातून प्रतापराव जाधव विजयी

बुलढाणा : बुलढाणा लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत प्रतापराव गणपतराव जाधव यांना ३ लाख ४९ हजार ८६७ मते मिळाली आहेत. त्यांचे प्रतिस्पर्धी नरेंद्र दगडू खेडेकर यांना ३ लाख २० हजार ३८८ मते मिळाली. २९ हजार ४७९ मतांनी श्री. जाधव विजयी झाले आहे. निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते श्री. जाधव यांना प्रमाणपत्र देण्यात आले. लोकसभा निवडणुकीत उमेदवारांना मिळालेली मते खालीलप्रमाणे आहेत. गौतम मघाडे (बहुजन समाज पार्टी) -८ हजार २१८ प्रतापराव जाधव (शिवसेना) - ३ लाख ४९ हजार ८६७ नरेंद्र खेडेकर (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे) -३ लाख २० हजार ३८८ असलम शाह हसन शाह (महाराष्ट्र विकास आघाडी) - ६ हजार १५३ मच्छिंद्र मघाडे (सोशालिस्ट पार्टी इंडिया) - ५ हजार २५८ माधवराव बनसोडे (बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी) - २ हजार ४५५ मोहम्मद हसन इनामदार (मायनॉरिटीज डेमोक्रॅटक पार्टी) - ४ हजार ९७८ वसंतराव मगर (वंचित बहुजन आघाडी) - ९८ हजार ४४१ विकास नांदवे (भीम सेना) - २ हजार ३३१ प्रा. ुमन तिरपुडे (पीपल्स पार्टी ऑफ इंडिया) - १ हजार ५११ संतोष इंगळे (रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया) - २ हजार ५३० अशोक हिवाळे (अपक्ष) - १५ हजार ४३६ उध्दव आटोळे (अपक्ष) - १ हजार ९६८ गजानन धांडे (अपक्ष) -४ हजार ८५४ दिनकर संबारे (अपक्ष) -४ हजार ५६४ नंदु लवंगे (अपक्ष) - ५ हजार ७१३ प्रताप पाटील (अपक्ष) - २ हजार ५६१ बाळासाहेब इंगळे (अपक्ष) - ३ हजार ९३१ रविकांत तुपकर (अपक्ष) - २ लाख ४९ हजार ९६३ रेखा पोफळकर (अपक्ष) - १ हजार ५४० संदीप शेळके (अपक्ष) - १३ हजार ०५० नोटा - ३ हजार ७८६ एकूण वैध मते - ११ लाख ९ हजार ४९६ पोस्टल बॅलेटमधील अवैध मते - ११०

# उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे ओमप्रकाश भूपालसिंह ऊर्फ पवनराजे राजेनिंबाळकर विजयी



धाराशिव : (माध्यम कक्ष) ४० - उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघाच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी ७ मे रोजी मतदान झालेल्या निवडणुकीच्या मतमोजणीला आज ४ जून रोजी सकाळी ८ वाजतापासून शासकीय तंत्रनिकेतन, धाराशिव येथे सुरुवात झाली.एकूण ३० फेरीनंतर निकाल घोषित करण्यात आला.

या निवडणुकीत शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे उमेदवार ओमप्रकाश भूपालसिंह ऊर्फ पवनराजे राजेनिंबाळकर हे ३ लक्ष २९ हजार ८४६ एवढ्या मताधिकक्याने विजयी झाले. श्री.ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (अजित पवार गट) च्या उमेदवार सौ अर्चना पाटील यांचा पराभव केला.श्री.राजेनिंबाळकर या ७ लक्ष ४८ हजार ७५२ मते पडली.

निवडणूकीच्या रिंगणात उभ्या असलेल्या ३१ उमेदवारांना पडलेली मते पुढीलप्रमाणे. सौ.अर्चना राणाजगजितसिंह पाटील, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (अजित पवार गट)(४ लक्ष १८ हजार ९०६),ओमप्रकाश भुपालसिंह उर्फ पवनराजे निंबाळकर, शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) (७ लक्ष ४८ हजार ७५२),संजयकुमार भागवत वाघमारे,बहुजन समाज पार्टी (५ हजार ६१५),आर्यनराजे किसनराव शिंदे, राष्ट्रीय समाज दल (आर) (१८८७),भाऊसाहेब रावसाहेब आंधळकर,वंचित बहुजन आघाडी (३३ हजार ४०२),नेताजी नागनाथ गोरे,देश जनहित पार्टी (२ हजार ३३६), नवनाथ विश्र्वनाथ दुधाळ,विश्र्व शक्ती पार्टी (१ हजार १३५),नितेश शिवाजी पवार,हिंदराष्ट्र संघ (१ हजार ७९),ड. विश्र्वजीत विजयकुमार शिंदे, आदर्श संग्राम पार्टी (८६५),शामराव हरीभाऊ पवार, समनक जनता पार्टी (१५०९),शेख नौशाद इकबाल,स्वराज्य शक्ती सेना (१६८६), सिध्दीक इब्राहीम बौडीवाले उर्फ गोलाभाई, ऑल इंडिया मजलीस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (२०६०),ज्ञानेश्र्वर नागनाथ कोळी,समता पार्टी (६४७२), अर्जुन (दादा) सलगर,अपक्ष ( १९३५), उमाजी पांडूरंग गायकवाड,अपक्ष (३०९५),काका फुलचंद कांबळे, अपक्ष(४८११),काकासाहेब संदिपान खोत,अपक्ष (५७१५),गोवर्धन सुब्राव निंबाळकर,अपक्ष (१८९६६), नवनाथ दशरथ उपळेकर,अपक्ष (२१०८), नितीन नागनाथ गायकवाड,अपक्ष (७३१), ड.भाऊसाहेब अनिल बेलुरे,अपक्ष (६७७),नितीन खंडू भोरे,अपक्ष (१२०४) मनोहर आनंदराव पाटील,अपक्ष (११९०), योगीराज आनंता तांबे,अपक्ष (१३३६), राजकुमार साहेबराव पाटील,अपक्ष (५९३),राम हनुमंत शेंडगे,अपक्ष (३२६३),विलास भागवत घाडगे,अपक्ष (६१०),शायनी नवनाथ जाधव,अपक्ष (७८२),समीरसिंह रमेशचंद्र साळवी,अपक्ष (५९४), सोमनाथ नानासाहेब कांबळे- अपक्ष (१२६८), हनुमंत लक्ष्मण बोंदर, अपक्ष (२१७२) आणि नोटा (४२९८)असे मतदान झाले.एकूण १२ लक्ष ८१ हजार ५२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये टपाल मतपत्रिकेच्या ७९५३ मतांचा समावेश आहे.निवडणूकीत विजयी झालेले शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे उमेदवार श्री.ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांनी विजयी झाल्याबद्दल भारत निवडणूक आयोगाचे प्रमाणपत्र दिले.

पान १ वरुन

## अबकी बार आघाडी सरकार..!

चंद्राबाबू नायडू या नेत्यांशी प्रामुख्याने तसेच रालोआ आघाडीतील इतरही नेत्यांशी आता मोदी आणि भाजपला सरकारजुळणीपासून चर्चा करावी लागेल. 'अबकी बारङ्क' या भाजपच्या आवडत्या ललकारात आता निव्वळ मोदींऐवजी 'आघाडी सरकार' या शब्दांचा अनपेक्षित शिरकाव झाला.

राम मंदिर उभारणीनंतर अवघ्या काही महिन्यांनी अयोध्येमध्ये भाजपचा उमेदवार लोकसभा निवडणुकीत पराभूत होणे, ही बाब बरेच काही दर्शवून गेली. नितीशकुमार आणि चंद्राबाबू नायडू या नेत्यांशी प्रामुख्याने तसेच रालोआ आघाडीतील इतरही नेत्यांशी आता मोदी आणि भाजपला सरकारजुळणीपासून चर्चा करावी लागेल. 'अबकी बार' या भाजपच्या आवडत्या ललकारात आता निव्वळ मोदींऐवजी 'आघाडी सरकार' या शब्दांचा अनपेक्षित शिरकाव झाला.

केंद्रीय मंत्री स्मृती इराणी, अर्जुन मुंडा, राजीव चंद्रशेखर, रावसाहेब दानवे, कपिल पाटील, अजय मिश्रा टेनी या केंद्रीय मंत्र्यांना पराभवाचा धक्का बसला. कॉंग्रेसचे लोकसभेतील गटनेते अधिरंजन चौधरी यांच्याविरोधात क्रिकेटपटू युसूफ पठाणने विजय मिळविला. कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांचे बंधू डी. के. सुरेश आणि कमलनाथ यांचे पुत्र नकुलनाथ यांनाही पराभवाला सामोरे जावे लागले.

## प्रणिती शिंदे यांचा विजय..

कॉंग्रेस, भाजपसह वचिंतनेही आपला उमेदवार रिंगणात उतरवला होता. २०१९ मध्ये वचिंत आघाडीकडून प्रकाश आंबेडकरांनी निवडणूक लढवली होती. ते तिसऱ्या क्रमांकावर राहिले होते, पण त्याचा फटका कॉंग्रेसला बसला होता. यंदा मात्र प्रकास आंबेडकर यांनी वचिंतकडून राहुल गायकवाड यांना रिंगणात उतरवले होतं. मात्र, गायकवाड यांनी ऐनवेळी माघार घेत कॉंग्रेसमध्येच प्रवेश केला. त्यामुळे वचिंतने अपक्ष उमेदवार अतिष बनसोड यांना पाठिंबा जाहीर केला. मात्र तरीही प्रकाश आंबेडकरांची जादू म्हणावी तितकी चालली नसल्याचे दिसले.

मोहोळ ६३.१५, सोलापूर शहर उत्तर ५९.१५, सोलापूर शहर मध्य ५६.५१, अक्कलकोट ५९.१७, सोलापूर दक्षिण ५८.२८, पंढरपूर ५९.०४ मतदान झाले, असे एकूण अंदाजित मतदानाची टक्केवारी ५९.१९ टक्के झाली आहे.

महाविकास आघाडीकडून प्रणिती शिंदेना उमेदवारी लवकर जाहीर झाल्याने सुरुवातीला त्यांनी प्रचारात आघाडी घेतली होती. प्रणिती शिंदे यांनी गावागावात जाऊन कॉर्नर बैठका आणि लोकांशी थेट संवाद साधण्यावर भर दिला. प्रणिती शिंदेंसाठी राहुल गांधी, उद्धव ठाकरे आणि नाना पटोले यांच्या सभा झाल्या. राहुल गांधी आणि उद्धव ठाकरेंच्या सभेला मोठ्या प्रमाणात गर्दी होती. उद्धव ठाकरेंच्या सभेत मुस्लिम समजाची गर्दी लक्षणीय होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेनंतर ठाकरेंची सभा झाली होती. या सभेत उद्धव ठाकरेंनी मोदींच्या प्रत्येक टीकेला प्रत्युत्तर दिलं. तर महायुतीचे उमेदवार राम सातपुते यांनी दिग्गज नेत्यांच्या सभांवर भर दिला. पंतप्रधान नरेंद्र मोदी, उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी इत्यादी नेत्यांच्या सभा राम सातपुतेंच्या प्रचारार्थ पार पडल्या. या सर्व सभा आणि प्रचाराचा परिणाम मतदारांवर नक्कीच होणार आहे. यंदाच्या निवडणुकीत शेतकऱ्यांचे प्रश्र्न, मराठा आरक्षणाच्या मुद्द्यासह सोलापुरातील पाणी प्रश्र्न, उद्योग धंद्याचा प्रश्र्न, सोलापुरातील बेरोजगारी हे मुद्दे मोठ्या प्रमाणात चर्चेत आले. तर भाजपने ही निवडणूक राष्ट्रीय मुद्याकडे देखील वळवण्याचा प्रयत्न केला. धार्मिक धुर्वीकरणाचे राजकारण देखील यंदाच्या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात पाहायला मिळाले. या सर्व बाबींचा थेट परिणाम निकालावर होणार आहे.

## धैर्यशील मोहिते पाटलांनी मारलं

करमाळा येथे ५५ टक्के झालं आहे. माढा तालुका ६१ टक्के, माळशिरस ६० टक्के, माण ५८ टक्के मतदान झाले. मतदानाच्या वेळी सर्वात तणावपूर्ण स्थिती सांगोला तालुक्यात होती. सांगोला तालुक्यात देखील ६० टक्के मतदान होताना हाणामारी आणि बाचाबाचीच्या घटना समोर आल्या होत्या. यात बागलवाडी येथे एका तरुणानं थेट ईव्हीएम मशीन जाळण्याचाही प्रयत्न केला. मात्र, सुदैवानं मशीनला कोणताही धोका न पोचल्यानं पुनर्मतदान घेण्याची वेळ आली नाही. करमाळा शहरामध्ये दिवसभर शांततेत मतदान झालं असताना संध्याकाळी एका तरुणानं खिशात आणलेल्या हातोडीनं ईव्हीएम मशीन फोडण्याचाही प्रयत्न केला.

२०१९ साली माढा लोकसभा मतदारसंघातून भाजपकडून रणजितसिंह निंबाळकर यांनीच निवडणूक लढवली होती. त्यांच्या विरोधात संजयमामा शिंदे यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या पाठिंब्यावर अपक्ष निवडणूक लढवी होती. यामध्ये रणजितसिंह निंबाळकर यांचा ८५७६४ मतांनी विजयी झाला होता.

माढा लोकसभा मतदारसंघात देखील मराठा कार्ड प्रभावी ठरल्याची चर्चा आहे. कारण मराठा आरक्षणाच्या मुद्यावरुन मराठा तरुणांनी भाजपच्या विरोधात आक्रमक पवित्रा घेतल्याचे पाहायला मिळाले होते. याचा फायदा धैर्यशील मोहिते पाटील यांनी होण्याची शक्यात आहे. तर मराठा मतांचा फटका रणजितसिंह निंबाळकरांना बसण्याची शक्यता देखील वर्तवली जातेय.

माढा लोकसभा मतदारसंघाकडं संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं आहे. कारण या मतदारसंघात दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. रणजितसिंह निंबाळकर यांच्यासाठी खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीवस यांनी सभा घेतल्या आहेत. तर धैर्यशील मोहिते पाटील यांच्यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी सभा घेतल्याचं पाहायला मिळालं. दरम्यान, २०१९ च्या निवडणुकीपुर्वी मोहिते पाटील कुटुंबाने भाजपमध्ये प्रवेश केला होता. यावेळच्या निवडणुकीत मोहिते पाटलांनी रणजितसिंह निंबाळकरांना एक लाख मतांचं मताधिक्य दिलं होतं. यावेळी मात्र, मोहिते पाटील हे भाजपकडून निवडणूक लढवण्यास इच्छुक होते मात्र, त्यांना भाजपनं तिकीट दिले नाही. पुन्हा निंबाळकरांनांच तिकीट दिले. त्यामुळं नाराज असलेल्या धैर्यशील मोहिते पाटील यांनी शरद पवार गटात प्रवेश करत उमेदवारी मिळवली.

# रायगड लोकसभा मतदारसंघात सुनील तटकरे ८२ हजार ७८४ मतांनी विजयी



रायगड : लोकसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ मध्ये ३२ रायगड लोकसभा मतदार संघातून राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (अजित पवार गट)चे उमेदवार सुनील तटकरे ८२ हजार ७८४ मतांनी विजयी झाले. त्यांनी निकटचे प्रतिस्पर्धी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) उमेदवार अनंत गीते यांना पराभूत करून विजय मिळवला. जिल्हा क्रीडा संकुल, नेहुली ता. अलिबाग येथील मतमोजणी केंद्रावर आज सकाळी ८ वाजता प्रत्यक्षात मतमोजणी सुरु झाली, २९ फेर्यांमध्ये ही मतमोजणीची प्रक्रिया शांततेत पूर्ण झाली.

लोकसभा निवडणुकीत मतमोजणी झालेल्या एकूण १० लाख १३ हजार २७२ मतांपैकी उमेदवारनिहाय मिळालेली मते पुढीलप्रमाणे आहेत. १) श्री.अनंत गंगाराम गिते, (शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे) - ४२५५६८ मते २)श्री.सुनिल दत्तात्रेय तटकरे, (नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी) - ५०८३५२ मते ३) श्रीमती कुमोदिनी रविंद्र चव्हाण, (वंचित बहुजन आघाडी) - १९६१८ मते ४) श्री. श्रीनिवास सत्यनारायण मट्टपरती, (अपक्ष) - ९३९४ मते ५) श्री.अमित श्रीपाल कवाडे,(अपक्ष) - ५६३४ मते ६) श्री.अनंत बाळोजी गिते (अपक्ष) - ३५१५ मते ७) श्री.नितीन जगन्नाथ मयेकर, (अपक्ष) - २५६० मते ८) श्री.पांडुरंग दामोदर चौले, (अपक्ष) - २४१७ मते ९) श्री.अनंत पद्मा गिते (अपक्ष) - २०४० मते १०) श्री.प्रकाश बाळकृष्ण चव्हाण, (भारतीय जवान किसान पार्टी) - १९३९ मते ११) श्री. मंगेश पद्माकर कोळी, (अपक्ष) - १८२० मते १२) श्री.अजय यशवंत उपाध्ये, (अपक्ष) - १७९५ मते १३)श्रीमती अंजली अश्र्विन केळकर,(अपक्ष) - १३५० मते १४) नोटा - २७ हजार २७० मते.

## जुन्या मित्रांबरोबर लवकरच ..

अशी असल्याचे आम्ही सांगत होतो. आम्ही नम्रपणे जनतेचा कौल स्वीकारला आहे,' असे ते म्हणाले. कोणत्याही एका पक्षाला पूर्ण बहुमत मिळालेले नाही. विशेषत: 'एक व्यक्ती एक चेहरा' हे धोरण असलेल्या भाजपला मतदारांनी नाकारले आहे, असे खरगे म्हणाले.

## इंडिया आघाडीनं सत्ता स्थापनेचा ..

चंद्राबाबू नायडूंना भाजपनं काही कमी त्रास दिलेला नाही. भाजपच्या त्रासाला कंटाळलेली लोकं इंडिया आघाडीत येतील,असं उद्धव ठाकरे म्हणाले. आम्ही कोणत्या व्यक्तीच्या विरोधात नाही, असंही उद्धव ठाकरे म्हणाले. ज्यादिवशी आमची आघाडी झाली होती त्यावेळी ती संविधान वाचवण्यासाठी झाली होती. देशभक्त आमच्यासोबत येतील. चंद्राबाबू नायडू आमच्यासोबत येतील, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

छळवणुकीला सर्व लोक कंटाळली आहेत आणि चिडली आहेत, असं उद्धव ठाकरे म्हणाले. सुडाच्या राजकारणाला कंटाळलेले देशभक्त एकत्र येतील, असं उद्धव ठाकरे म्हणाले. माझी आणि ममता बॅनर्जी यांची चर्चा झाली आहे, असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं. महाराष्ट्रात ४८ जागांवर आमचा विजय व्हावा, अशी अपेक्षा होती, असं उद्धव ठाकरे म्हणाले. आम्हाला अजून चार पाच जागांची अपेक्षा होती, असं उद्धव ठाकरेंनी सांगितलं. अमोल कीर्तिकर यांच्या जागेबाबत जो निर्णय होईल त्याला आव्हान होईल, उद्धव ठाकरे म्हणाले. कोकण आणि ठाण्याचा पराभव अनाकलनीय आणि क्लेषदायक आहे, असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं. पंतप्रधान जिथं जिथं गेले तिथं त्याचा आम्हाला फायदा झाला, असं उद्धव ठाकरे म्हणाले. माझ्यावर जेवढ्या लोकांनी विश्र्वास ठेवला त्या सर्व लोकांचे आभार मानतो. पार्टी तोडली गेली, पक्ष चिन्ह हिसकावलं गेलं, मशालीवर आम्हाला निवडणूक लढावी लागली, असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# कोल्हापूर लोकसभा मतदारसंघातून शाहू शहाजी छत्रपती तर हातकणंगले मधून धैर्यशील माने विजयी

कोल्हापूर : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत ४७ कोल्हापूर लोकसभा मतदार संघातून शाहू शहाजी छत्रपती १ लाख ५४ हजार ९६४ मतांनी तर हातकणंगले मधून धैर्यशील माने १३ हजार ४२६ मतांनी विजयी झाले. दोन्ही लोकसभा मतदारसंघात दिनांक ७ मे रोजी मतदान झाले होते. कोल्हापूरमधून एकुण २३ उमेदवारांनी तर हातकणंगलेमधून २७ उमेदवारांनी निवडणूक लढवली.

४७ कोल्हापूर लोकसभा मतदार संघाची मतमोजणी रमणमळा व ४८ हातकणंगले लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी राजाराम तलाव येथील शासकीय धान्य गोदाम इमारतींमध्ये शांततेत पार पडली. कोल्हापूर मतदारसंघांमध्ये निवडून आलेले शाहु शहाजी छत्रपती यांना निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या हस्ते तर हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून निवडून आलेले उमेदवार धैर्यशील माने यांना संजय शिंदे यांच्या हस्ते विजयी उमेदवाराचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. मतमोजणी प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी २७१ चंदगड - मल्लिकार्जुन माने, २७२ राधानगरी -वसुंधरा बारवे, २७३ कागल - सुशांत बनसोडे, २७४ कोल्हापूर दक्षिण - हरिष धार्मिक, २७५ करवीर - वर्षा शिंगण, २७६ कोल्हापूर उत्तर - संपत खिलारी, २७७ शाहूवाडी - समीर शिंगटे, २७८ हातकणंगले - शक्ती कदम, २७९ इचलकरंजी - मोसमी चौगुले, २८० शिरोळ - मोहिनी चव्हाण, २८३ इस्लामपूर - श्रीनिवास अर्जुन व २८४ शिराळा - रघुनाथ पोटे यांनी काम पाहिले. कोल्हापूरसाठी मतमोजणी निरीक्षक रोहित सिंग व अतिरिक्त मतमोजणी निरीक्षक श्रीमती के.पोर्कोडी यांनी काम पाहिले. तर हातकणंगलेसाठी मतमोजणी निरीक्षक संदीप नांदुरी व अतिरिक्त मतमोजणी निरीक्षक मदन लाल नेहरा यांनी काम पाहिले. पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित यांच्या




मार्गदर्शनाखाली मतमोजणी ठिकाणी व मतमोजणीबाहेरील सार्वजनिक ठिकाणी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अमोल येडगे यांनी सर्व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, मतमोजणी अधिकारी, सर्व नोडल अधिकारी, सहायक नोडल अधिकारी, कर्मचारी तसेच निवडणूक व मतमोजणी प्रक्रियेबाबत चांगली प्रसिद्धी दिल्याबद्दल माध्यम प्रतिनिधींचे आभार मानले.

४७ कोल्हापूरसाठी सहाही विधानसभा मतदार संघात प्रत्येकी १४ मतमोजणी टेबलवरुन चंदगड २८, राधानगरी ३१, कागल २६, कोल्हापूर दक्षिण २४, करवीर २६ आणि कोल्हापूर उत्तरची २३ फेऱ्यातून मतमोजणी पूर्ण झाली.

४८ हातकणंगलेसाठी सहाही विधानसभा मतदार संघात प्रत्येकी १४ मतमोजणी टेबलवरुन शाहूवाडी व हातकणंगले प्रत्येकी २४, इचलकरंजी १९, शिरोळ व इस्लामपूर प्रत्येकी २१ तर शिरोळसाठी २४ फेऱ्यातून मतमोजणी पूर्ण झाली.

टपाली मतमोजणीसाठी १८ टेबल होते. आयोगाच्या सूचनांनुसार प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील पाच-पाच व्हीव्हीपॅटमधील मतमोजणी करण्यात आली. यासाठी ४७ कोल्हापूर लोकसभा मतदारसंघातील मतमोजणीसाठी ३४९ तर ४८ हातकणंगले लोकसभा मतदारसंघातील मतमोजणीसाठी ३३७ कर्मचारी असे एकुण ६८६ कर्मचारी नियुक्त केले होते. या व्यतिरिक्त अतिरिक्त १० टक्के कर्मचारी दोन्ही ठिकाणी राखीव होते. दोन्ही ठिकाणी ६००-६०० पोलीस कर्मचारी सुरक्षेच्या दृष्टीने तैनात करण्यात आले होते.

उमेदवार निहाय मिळालेल्या मतांची संख्या

४८ कोल्हापूर - शाहू शहाजी छत्रपती, (इंडियन नॅशनल काँग्रेस) - ७५४५२२ , संजय भिकाजी मागाडे, (बहुजन समाज पार्टी)-४००२ , संजय सदाशिवराव मंडलिक, (शिवसेना)-५९९५५८ , संदिप भैरवनाथ कोगले, (देश जनहित पार्टी, अपक्ष)-२९७५ , बसगोंडा तायगोंडा पाटील, (भारतीय जवान किसान पार्टी)-११०७ , अरविंद भिवा माने, (भारतीय राष्ट्रीय दल अपक्ष) -५७० , शशीभूषण जीवनराव देसाई, (अखिल भारत हिंदू महासभा,अपक्ष)-६५१ , सुनील नामदेव पाटील, (नॅशनल ब्लॅक पँथर पार्टी)- ६३३, संतोष गणपती बिसुरे, (अपनी प्रजाहित पार्टी)-६३९ , इरफान आबुतालिब चांद, (अपक्ष) -५९७ , कुदरतुल्ला आदम लतिफ, (अपक्ष) -४६७, कृष्णा हणमंत देसाई,

(अपक्ष)-६०४, कृष्णाबाई दिपक चौगले (अपक्ष)-३०६३ , बाजीराव नानासो खाडे, (अपक्ष)-३५१२ , नागनाथ पुंडलिक बेनके, (अपक्ष)-१२२७ , माधुरी राजू जाधव, (अपक्ष) -३५०८ , मुश्ताक अजीज मुल्ला, (अपक्ष)-३८२४ , मंगेश जयसिंग पाटील, (अपक्ष)-६५३ , ड. यश सुहास हेडगे-पाटील, (अपक्ष)-२४५९ , राजेंद्र बाळासो कोळी, (अपक्ष)-१०४४ , सलीम नुरमंहमद बागवान, (अपक्ष)-३३५, सुभाष वैजू देसाई, (अपक्ष)-८४९ , संदिप गुंडोपंत संकपाळ, (अपक्ष)-५४४ तर नोटाला ५९८३ एवढे मत मिळाली. अवैद्य मतदान ८४४ तर टेंडर्ड मतदान ३६ आहे. अशा प्रकारे एकुण १३ लाख ९४ हजार १७० मतदान झाले.

४८ हातकणंगले - रवींद्र तुकाराम कांबळे (बहुजन समाज पार्टी)-४०३३ , धैर्यशील संभाजीराव माने (शिवसेना)- ५२०१९० , सत्यजित बाबासाहेब पाटील -सरुडकर (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे)-५०६७६४ , इम्रान इकबाल खतीब, (पक्ष- बहुजन मुक्ती पार्टी)-३१९० , डॉ. ईश्र्वर महादेव यमगर, (भारतीय लोकशक्ती पार्टी)-१५३७ , दिनकरराव तुळशीदास चव्हाण (पाटील), (अपक्ष)-६७९ , धनाजी जगन्नाथ गुरव (शिवारेकर) (लोकराज्य जनता पार्टी)-१०६१ , दादगोंडा चवगोंडा पाटील (वंचित बहुजन आघाडी)-३२६९६ , रघुनाथ रामचंद्र पाटील (भारतीय जवान किसान पार्टी)-२१७४ , राजू उर्फ देवाप्पा आण्णा शेट्टी (स्वाभिमानी पक्ष)-१७९८५० , शरद बाबुराव पाटील, (नेशनल ब्लॅक पँथर पार्टी)-१३६१ , संतोष केरबा खोत (कामगार किसान पार्टी)-१७०१ , अस्लम ऐनोद्दिन मुल्ला, (अपक्ष)-६१११ , आनंदराव तुकाराम थोरात, (अपक्ष)-३४९९ , आनंदराव वसंतराव सरनाईक, (अपक्ष)-४९५५ , जावेद सिंकदर मुजावर, (अपक्ष)-१८५२ , लक्ष्मण श्रीपती डवरी (अपक्ष)-१००९ , लक्ष्मण शिवाजी तांदळे, (अपक्ष)-४७८९ , प्रा. परशुराम तम्मान्ना माने, (अपक्ष)-४४७७ , मनोहर प्रदीप सातपुते (अपक्ष)-१०६६ , महंमद मुबारक दरवेशी (अपक्ष)-३६१ , अरविंद भिवा माने (अपक्ष)-४२४ , देवेंद्र नाना मोहिते (अपक्ष)-५६० , राजेंद्र भिमराव माने, (अपक्ष)-९४० , रामचंद्र गोविंदराव साळुंखे (अपक्ष)-६१८ , शिवाजी धोंडीराम संकपाळ (अपक्ष)-१३९२ , सत्यजित पाटील (अपक्ष)-३६३२ तर नोटाला ५१०३ एवढे मत मिळाली. अवैद्य मतदान १२५८ तर टेंडर्ड मतदान ७ आहे. अशा प्रकारे एकुण १२ लाख ९७ हजार २८२ मतदान झाले.

# सातारा लोकसभा मतदार संघात मतमोजणी शांततेत पूर्ण

## श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले विजयी घोषित

सातारा/प्रतिनिधीः ४५ सातारा लोकसभा मतदारसंघाच्या मतमोजणीमध्ये श्रीमंत छत्रपती उदयनराजे प्रतापसिंहराजे भोसले यांना विजयी घोषित करण्यात आले. त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी शशिकांत जयवंतराव शिंदे यांच्यापेक्षा ३२ हजार ७७१ इतकी मते अधिक मिळाली. श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांना निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी प्रमाणपत्र दिले. यावेळी निवडणूक निरीक्षक सुरेन धिरण व आर अर्जुन यांच्या सह अपर जिल्हाधिकारी जीवन गलांडे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी भगवान कांबळे आदी उपस्थित होते.



उमेदवार निहाय मिळालेल्या मतांची संख्या पुढीलप्रमाणे श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले - ५ लाख ७१ हजार १३४, शशिकांत जयवंतराव शिंदे - ५ लाख ३८ हजार ३६३, आनंद रमेश थोरवडे - ६ हजार ४८५, प्रशांत रघुनाथ कदम - ११ हजार ९१२, तुषार विजय मोतलिंग - १ हजार ३०१, सयाजी गणपत वाघमारे - २ हजार ५०१, डॉ. अभिजित वामनराव आवाडे बिचुकले - १ हजार ३९५, सुरेशराव दिनकर कोरडे - ४ हजार ७१२, संजय कोंडिबा गाडे -३७ हजार ६२, निवृत्ती केरू शिंदे - २ हजार ६७४, प्रतिभा शेलार - १ हजार १२३, सदाशिव साहेबराव बागल - ९५८, मारुती धोंडीराम जानकर - ३ हजार ९५१, विश्र्वजित पाटील - उंडाळकर - ३ हजार ४३८, सचिन सुभाष महाजन - २ हजार १५, सीमा सुनिल पोतदार - ३ हजार ४५८, नोटा - ५ हजार ५२२ या प्रमाणे मते मिळाली आहेत. तसेच अवैध मतांची संख्या एकूण २ हजार १८० आहे. प्रदत्त मते - २५ आहेत.

मतमोजणीची प्रक्रिया संपूर्ण यंत्रणेने सुरळीतपणे पार पाडल्याबद्दल जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. डुडी यांनी संपूर्ण यंत्रणेचे आभार मानले. यावेळी त्यांनी कायदा व सुव्यवस्थेबद्दल पोलीस यंत्रणेचेही आभार मानले.

# अपयशाने खचू नका, नव्या उमेदीने लोकसेवेला वाहून घ्या, अजित पवारांचं कार्यकर्त्यांना आवाहन

मुंबई : लोकसभा निवडणुकीच्या निकालाचे चित्र आता जवळपास स्पष्ट झालं आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाकडून अधिकृत माहिती आली नसली तरीही आकडेवारीनुसार कोणत्या मतदारसंघात कोण आघाडीवर आहे याचा अंदाज लावता येत आहे. त्यानुसार, अजित पवार गटाला केवळ एकच जागा मिळाली आहे. रायगड लोकसभा मतदारसंघातून सुनील तटकरे यांनी ठाकरे गटाचे नेते अनंत गिते यांचा पराभव केलाय. परंतु, हा मतदारसंघ वगळता इतर तिन्ही मतदारसंघात अजित पवार गटाचा दारूण पराभव झाला आहे. अटीतटीच्या ठरलेल्या बारामती लोकसभा मतदारसंघातही सुनेत्रा पवारांना पराभव स्वीकारावा लागला आहे. या सर्व पार्श्र्वभूमीर अजित पवारांनी कार्यकर्त्यांना आवाहन केलं आहे.

अजित पवार म्हणाले, लोकसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाले आहेत. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस व महायुतीला मतदान केलेल्या समस्त मतदार बंधु-भगिनींचे सर्वप्रथम मनापासून आभार मानतो. प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली 'एनडीए'नं बहुमताचा टप्पा गाठला, त्याबद्दल प्रधानमंत्री महोदयांचं आणि 'एनडीए'च्या सर्व विजयी उमेदवारांचं अभिनंदन करतो. 'एनडीए'च्या विजयासाठी गेले काही महिने सातत्यानं परिश्रम घेतलेले सर्व नेते, कार्यकर्ते, हितचिंतक, मतदार बंधू-भगिनी सर्वांना धन्यवाद देतो.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसला मिळालेल्या अपयशामुळे कार्यकर्ते खचू नये याकरता अजित पवारांनी त्यांना आवाहन केलं आहे. ते म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस आणि महायुतीला राज्यात अपेक्षित यश मिळू शकलं नसलं तरी, भविष्यात हे चित्र बदलण्याची ताकद आपल्यात आहे. कुठलंही अपयश अंतिम नसतं. अपयशानं खचून न जाता नव्या उत्साहानं, उमेदीनं सर्व कार्यकर्त्यांनी पुन्हा एकदा स्वत:ला लोकसेवेला वाहून घ्यावं. राष्ट्रवादी काँग्रेस आणि महायुतीच्या नेत्यांकडून निकालाचं विश्र्लेषण केलं जाईल.

# आंध्र प्रदेशात टीडीपी अन् भाजपाला बहुमत, मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डींनी दिला राजीनामा

आंध्र प्रदेशः २०२४ च्या लोकसभा निवडणुकीचे निकाल जवळपास हाती आले असून, याबरोबरच आंध्र प्रदेश विधानसभा निवडणुकीचा निकालही लागला आहे. राज्यात भाजपा आणि एनडीएसाठी चांगली बातमी आहे. आंध्र प्रदेश विधानसभा निवडणूक २०२४ चे निकाल टीडीपीच्या बाजूने लागताना दिसत आहेत. सर्व १७५ विधानसभा जागांवर कल आणि निकाल समोर येत आहेत. चंद्राबाबू नायडू यांच्या तेलगू देसम पक्षाने (ढउ्झ) जगनमोहन रेड्डी यांच्या वायएसआर काँग्रेस पक्षाला (धडठउझ) खूप मागे सोडले आहे. टीडीपी पक्षाने ८८ जागांची विजयी आघाडी घेतली आहे. अशा स्थितीत आंध्र प्रदेशात सत्ता परिवर्तन निश्र्चित मानले जात आहे. आंध्र प्रदेशात विधानसभेच्या १७५ जागा आहेत. सरकार स्थापन करण्यासाठी ८८ आमदारांची गरज आहे. राज्यात भाजपाने चंद्राबाबू नायडू यांच्या तेलुगू देसम पार्टी (ढउ्झ) आणि अभिनेता पवन कल्याण यांच्या जनसेना पक्ष (गडझ)बरोबर युती केली आहे. टीडीपीला १३५ हून अधिक जागांवर आघाडी असून, जेएनपीला २१ तर भाजपाला आठ जागांवर विजयी आघाडी मिळाली आहे. धडठउझ ला फक्त ११ जागा जिंकता आलेल्या आहेत. तर काँग्रेससह अन्य पक्षांचे खातेही उघडले नाही. टीडीपीने ६३, जनसेना पक्षाने १३ तर भाजपने चार जागा जिंकल्या आहेत. तर वायएसआरसीपीने तीन जागा जिंकल्या आहेत.विशेष म्हणजे वायएस जगनमोहन रेड्डी यांनी आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. राजीनाम्याचे पत्र राज्यपालांना पाठवले आहे.

आंध्र प्रदेशात विधानसभेच्या १७५ जागांसाठी चुरशीची लढत आहे. इकडे बहुमत मिळवण्यासाठी कोणत्याही पक्षाला किंवा आघाडीला ८८ जागा जिंकाव्या लागतात. एका बाजूला सीएम जगनमोहन रेड्डी आहेत, ज्यांच्या सरकारने ३० मे रोजी पाच वर्षे पूर्ण केली आहेत, तर दुसऱ्या बाजूला टीडीपी-भाजपा युती आहे, ज्यांनी ही निवडणूक जिंकली आहे. चंद्राबाबू नायडू यांचा टीडीपी, पवन कल्याणचा जनसेना पक्ष आणि भाजपाने राज्यात एकत्र निवडणूक लढवली आहे. एनडीएची थेट स्पर्धा जगनमोहन रेड्डी यांच्या वायएसआरसीपीशी होती.

# पंकजा मुंडेंना पराभवाचा धक्का, बजरंग सोनवणेंनी मारली बाजी

बीड : अखेरच्या फेरीपर्यंत चुरशीच्या झालेल्या बीड लोकसभा मतदारसंघात माजी मंत्री आणि भाजपच्या नेत्या पंकजा मुंडे यांना पराभवाचा धक्का बसला आहे. महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस : शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी मुंडे यांचा ७ हजारहून अधिक मतांनी पराभव केला. शेवटच्या फेरीपर्यंत पंकजा मुंडेंना अटीतटीची लढत द्यावी लागली. ३१ व्या फेरी अखेर पंकजाना केवळ ४०० मतांची आघाडी होती. अखेर पूर्ण मतमोजणी झाल्यानंतर बजरंग सोनवणे यांना विजय घोषीत करण्यात आले.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत परळी विधानसभा मतदारसंघातून झालेल्या पराभवानंतर पंकजांना लोकप्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली नव्हती. त्यामुळे खासदारकीचं स्वप्न पाहत त्या कुटुंबाच्या पारंपरिक मतदारसंघातून लोकसभेच्या रिंगणात उतरल्या होत्या. दोन वेळा खासदार राहिलेल्या बहीण प्रीतम मुंडे यांचा पत्ता पक्षाने कट करुन पंकजांना तिकीट दिले होते.

निवडणूक कुठलीही असो त्यात संघर्ष, स्पर्धा, अटीतटीची लढत नाही, असे बीडमध्ये कधी होत नाही. त्याला यंदाची लोकसभा निवडणूकही अपवाद ठरलेली नाही. महायुतीच्या पंकजा मुंडे, महाविकास आघाडीचे बजरंग सोनवणे आणि वंचित बहुजन आघाडीचे अशोक हिंगे यांच्यात अत्यंत अटीतटीची लढत या वेळी पाहावयास मिळाली. विकासाच्या आणि राष्ट्रीय मुद्द्यांवर निवडणुकीत चर्चा होतानाच अखेरच्या टप्प्यात निवडणूक वेगळ्याच वळणावर जात असल्याचे चित्र दिसले.





महायुती, महाविकास आघाडीने अत्यंत प्रतिष्ठेच्या केलेल्या या निवडणुकीत बीडकर कुणाला विजयाची माळ घालणार, याची उत्सुकता सर्वांनाच होती. भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते गोपीनाथ मुंडे यांची जन्मभूमी व कर्मभूमी म्हणून बीडची ओळख. गोपीनाथ मुंडे बीडमधून दोन वेळा लोकसभेत विजयी झाले. त्यांच्या निधनानंतर बीडवासीयांनी त्यांच्या कन्या डॉ. प्रीतम मुंडे यांना दोन निवडणुकांत विजयी केले. गेल्या पाच वर्षांत राज्यात झालेले राजकीय बदल, जिल्ह्यातील राजकीय गणितांची उलथापालथ आणि मराठवाड्यात प्रभावी असलेला मराठा आरक्षणाचा मुद्दा यामुळे या वेळी बीड लोकसभा मतदारसंघाचे राजकीय गणित पुरते बदलून गेले होते.

महायुतीकडून प्रीतम यांच्याऐवजी त्यांच्या भगिनी माजी मंत्री पंकजा मुंडे; तर महाविकास आघाडीकडून बजरंग सोनवणे रिंगणात होते. वंचित बहुजन आघाडीने अशोक हिंगे यांना निवडणुकीच्या मैदानात उतरवले होते. एकूण ४१ उमेदवार लोकसभेच्या रिंगणात होते. अपक्ष व अन्य उमेदवार कुणाची किती मते खेचणार, यावर जय पराजयाची गणिते अवलंबून होती.

बीडच्या निवडणुकीत प्रतिस्पर्ध्यांवर जोरदार आरोप-प्रत्यारोप करण्याची अक्षरशः स्पर्धा असते. आधीच पाणीटंचाईने त्रस्त असलेल्या बीड जिल्ह्यात राजकीय वातावरण पुरते तापलेले होते. मराठा आरक्षण आंदोलनाचा प्रभाव आणि धग निवडणुकीत पाहावायस मिळाली. जातीय ध्रुवीकरणाची मतदारसंघात शक्यता व्यक्त केली जात होती.पंकजा यांचे भाऊ धनंजय मुंडे, अमरसिंह पंडित, प्रकाश सोळंके, सुरेश धस बाळासाहेब आजबे, नमिता मुंदडा, लक्ष्मण पवार, रमेश आडसकर, मोहन जगताप आदी मंडळी आपापल्या भागामध्ये तळ ठोकून होती. दुसरीकडे महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्यासाठी आमदार संदीप क्षीरसागर, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख, माजी आमदार उषा दराडे, साहेबराव दरेकर, पृथ्वीराज साठे, बदामराव पंडित आदींच्या मदतीने किल्ला लढवत होते. अशोक हिंगे यांच्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी सभा घेतली. या राजकीय लढाईत विजयाचा गुलाल कोण उधळणार याकडे राज्याचे लक्ष लागले होते.

# श्री विठ्ठल रुक्मिणीसाठी लाकडी मेघडंबरी अर्पण

पंढरपूर/प्रतिनिधीः विठोबा रखुमाईच्या मूर्तीची शोभा वाढविणारी लाकडी मेघडंबरी तयार झाली असून येथील श्री संत कबीर महाराज मठाकडून श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीकडे ती सुपुर्द करण्यात आली. श्री विठ्ठल व रुक्मिणींच्या गाभाऱ्याच्या संवर्धनाचे पूर्ण झाले असून मूर्तीवर पूर्वी मेघडंबरी होती. मात्र, पूर्वीची लाकडी मेघडंबरी व त्यावर असणारी चांदी खराब झाल्यामुळे समितीने या दोन्ही मेघडंबरी नव्याने करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, येथील श्री संत कबीर महाराज मठ व फडातर्फे सेवाभावी तत्त्वावर या दोन मेघडंबरी अर्पण करण्यात आल्या. मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या उपस्थितीत याचे हस्तांतर करण्यात आले. या दोन मेघडंबरींपैकी एक १६० किलो तर दुसरी ११० किलोची असू याची किंमत साडेतीन लाख रुपये आहे. येथील अमोल सुतार, बाळू सुतार, पांडुरंग लोंढे या कारागिरांनी ४० दिवस मेहनत करून सागवानी लाकडापासून ही मेघडंबरी तयार केली आहे. यावर आता मंदिर समिती चांदीचे आवरण करणार आहे. यावेळी कबीर मठाचे विष्णू महाराज कबीर तसेच मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, संभाजी शिंदे, कार्यकारी अधिकारी ाजेंद्र शेळके, व्यवस्थापक बालाजी पुदलवाड, संजय कोकीळ, ज्ञानेश्वर कुलकर्णी, बलभीम पावले, राजेंद्र सुभेदार, अतुल बक्षी, अमित नवाळे आदी उपस्थित होते.


युवा नेतृत्व
मा.प्रणिती शिंदे
यांचे खासदारपदी
निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन..
-: शुभेच्छुक :-
प्रोप्रा. - विजय घनघाव
मोबा. नं. 8483000831
8208540856
प्रबुध्द एंटरप्राइजेस
बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स
आमच्याकडे जेसीबी, डंपर, आयवा, पोकलेन
आदी गाडया कंन्स्ट्रक्शन साठी भाडयाने मिळतील
दुकान नंबर 2, अमरधाम चौक, खेमानी, उल्हासनगर - 421 002
प्रोप्रा.विजय घनघाव